करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक
कमलाभवानी
# संदेश
वर्ष 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३० | पाने-१६ | दि.१६/०५/२०२५ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.


Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टॉईज
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106)

हॉटेल
राजयोग
बायपास रोड, करमाळा., जि.सोलापूर.
फ्रेंज
• शुध्द शाकाहारी
• चायनीज
लॉन्स
मुंज, वाढदिवस, डोहाळे जेवण, साखरपुडा, नामकरण सोहळा, गेट-टूगेदर, कंपनी पार्टीसाठी
प्रोप्रा : राजेंद्र मोरे (मो.9503175444) सर्व सुविधा उपलब्ध..!

# दहिगाव बंद नलिका वितरण - सत्ताधारी राष्ट्रवादीचे आंदोलन

## ३० मे पासून काम सुरू होणार

करमाळा(सं.प्र.) : दहिगाव उपसासिंचन योजनेचे बंद नलिका वितरण प्रणालीचे बंद पडलेले काम तात्काळ सुरू करण्याबाबत सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने १६ मे ला शुक्रवारी सकाळी साडेनऊ वाजता अर्जुननगर फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी कुकडी डावा कालवा उपविभाग क्र.१२ चे उपविभागीय अधिकारी श्री.राजगुरू यांनी हे काम ३० मे पासून सुरू करण्यात येईल; असे लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भरत आवताडे यांच्यासह हनुमंत मांढरे, विलासकाका राऊत, चंद्रहास निमगिरे, विवेकराव येवले, शितल क्षीरसागर, नंदिनी लुंगारे, अशपाक जमादार, भाजपाचे गणेश चिवटे, मनसेचे नानासाहेब मोरे, कांतीलाल राऊत, आशिष



गायकवाड, सोमनाथ रोकडे, अशोक माने, रविंद्र वळेकर, गणेश सरडे, शहाजी कोंडलकर, स्वप्निल पाटुळे, विलास बेडकुते, रणजित देवकर व माजी आमदार(पान २)

### सर्व मलिद्याचा खेळ ?

यात विद्यमान लोकप्रतिनिधीच्या प्रतिनिधीने सदरचे काम माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी जनतेच्या हितासाठी न करता स्वत:च्या कमिशनसाठी मंजूर केले आहे; असे म्हटले आहे. तर माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या प्रतिनिधीने हे काम एक वर्षभर सुरू होते. तेव्हा विरोध केला नाही, परंतु विद्यमान लोकप्रतिनिधींना काही अपेक्षा आहेत, त्या पूर्ण होत नाहीत म्हणून त्याला विरोध केला जात आहे. दोन्ही गटाकडून एकमेकांवर केलेले आरोप पाहता विकासकामा पेक्षा हा वाद मलिद्याचा आहे की काय ? अशी शंका निर्माण होते.

यशोदीप प्रा.लि;
आपल्या सेवेत घेऊन आलो आहोत..
"सर्वसोयीनेयुक्त"
यशोदीप
मंगल कार्यालय
पत्ता : यशोदीप नगर, निलज रोड, करमाळा.
प्रोप्रा : संदीप दिलीपराव बोकन
दैवत.. आई-वडिलांचा शुभ-आशिर्वाद


वैशिष्ट्ये
• शहरापासून ५ मिनीटाच्या अंतरावर
• शांत व निसर्गरम्य वातावरण
• प्रशस्त डायनिंग हॉल
• सुसज्ज बैठक व्यवस्था
• भव्य ४ एकर पार्किंग व्यवस्था
• सुसज्ज सहा रूम
• संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेरा
• छोट्या कार्यक्रमासाठी छोटा हॉल उपलब्ध.
बुकींग सुरू
एकदा येवून तर पहा.. आपण सुध्दा म्हणताल..
मंगल कार्यालय म्हणजे... आपलं.. यशोदीपचं !
आपल्या लाडक्यांसाठी.. आपलं हक्काचं..
आपलं 'यशोदीप मंगल कार्यालय' !
सर्व प्रकारच्या ऑर्डर स्विकारल्या जातील.
• लग्न • वाढदिवस • नामकरण • साखरपुडा • स्वागत समारंभ
• रिसेप्शन • गेट टुगेदर • डोहाळे जेवण • बैठक, मिटींग
संपर्क : यशोदीप ज्वेलर्स, दत्तपेठ, करमाळा. (9405713769, 9423069349)

Scanned with OKEN Scanner

शुक्रवार दि.१६ मे २०२५ | संदेश साप्ताहिक कमलाभवानी 

एकमेकांबद्दल प्रेम ठेवल्याने माणुसकीचं नातं दृढ होतं.

## संपादकीय.......................................!

# मत्सर

गेल्या आठवड्यात भगतवाडी येथे एका माथेफिरूने विक्रम जाधव यांचा ऊस रात्रीचाच पेटवला. एवढंच नाहीतर त्यांचे चुलते बजरंग जाधव यांची जवळपास साडेतीनशे केळीची रोपं बुडातून कापून टाकली आहेत. हे कृत्य माणुसकीला काळीमा फासणारी आहेत. शेतकरी अनंत अडचणीला तोंड देत आपली पिके जगवत असतो. आहे त्या पिकावर शेतकऱ्याचं भवितव्य अवलंबून असतं. अशा शेतकऱ्याचे हे नुकसान करणं म्हणजे न देखवण्याचा प्रकार आहे. न देखवणं यालाच मत्सर म्हणतात.

मत्सर म्हणजे इतरांकडे असलेल्या गोष्टींमुळे किंवा त्यांच्या यशामुळे वाईट वाटणे , हेवा वाटणे. मत्सर या भावनेमध्ये असुरक्षितता, राग किंवा असहाय्यता याच समावेश होतो. मत्सर म्हणजे दुसऱ्याच्या यशाचे किंवा त्यांच्याकडे असलेल्या गोष्टीचे कौतूक न करता त्यांचा हेवा करणे होय. आपल्याकडे काहीतरी कमी आहे किंवा आपण इतरांपेक्षा कमी आहोत; अशी जेव्हा भावना होते तेव्हा त्यातून मत्सर निर्माण होतो. मत्सरामुळे व्यक्तीच्या जीवनात संताप निर्माण होतो. मत्सर आणि ईर्षा या दोन भावनामध्ये काही फरक आहे. मत्सर म्हणजे इतरांकडे असलेली वस्तू आपणाला हवी आहे असे वाटणे किंवा हेवा वाटणे. तर ईर्षा म्हणजे आपण आपल्यापेक्षा इतरांना चांगले वाटणे. थोडक्यात आपल्या मित्राने नवीन गाडी घेतल्यानंतर त्याच्या यशाचा हेवा वाटणे म्हणजे ती ईर्षा होय.

मत्सर, ईर्षा व द्वेष हे तीन शब्द समानार्थी वाटत असलेतरी या प्रत्येकाचा अर्थ वेगवेगळा आहे. द्वेष म्हणजे एखादी व्यक्ती, विचार किंवा समुहाबद्दल तीव्र नकारात्मक भावना असणे. यात राग, तिरस्कार आणि घृणा यासारख्या भावनांचा समावेश होतो. अनेकदा द्वेष प्रेमाच्या विरूध्द मानले जाते. ती व्यक्ती समुहाचे नुकसान करण्याचा किंवा त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करते. द्वेष हा तीव्र भावनिक प्रतिसाद आहे. द्वेष हा प्रेमाच्या विरूध्द मानला जातो. कारण प्रेम सकारात्मक व सहानुभूतीपूर्वक असते. प्रेमामध्ये फक्त दिलं जातं, घेतलं जात नाही. जिथं घेतलं जातं तिथं प्रेम असत नाही.

मनुष्याच्या जीवनामध्ये तो आजारी का पडतो किंवा त्याचा आजार काय आहे, याचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास केला तर माणसाच्या आजारील पाच टक्के आजार शरीराचे असतात तर ९५ टक्के आजार मनाचे असतात. मनाचे आजार हे विचारशक्तीतून बळावत असतात. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगात एखादा माणुस आपला पुढे गेला त्याबद्दल जलसी/मत्सर निर्माण होतो. आणि तो आजार जो आहे तो संसर्गजन्य आजार आहे. नकारात्मक भावना जिथे निर्माण होते तिथे मत्सर प्रवेश करतो. आपल्याकडे काही कमी आहे या भावनेतूनच समोरच्याबद्दल मत्सर निर्माण होतो. एखाद्याचं वक्तृत्व चांगलं असेल, एखाद्याचं लिखाण चांगलं असेल, एखाद्याचा व्यवसाय चांगला चालत असेल किंवा एखादा शेतीतून चांगलं उत्पन्न मिळवत असेलतर त्याच्याबद्दल द्वेषभावना निर्माण होते यालाच मत्सर म्हणतात. ते त्याच्या जवळ आहे व माझ्या जवळ का नाही.. या भावनेतून हा मत्सर तयार होतो. मत्सरातून व्यक्तीचा जळफळाट होतो. मग त्या व्यक्तीबद्दल मनात द्वेषभावना निर्माण होऊन त्या व्यक्ती पेक्षा आपली प्रगती जादा न करता त्या व्यक्तीला कमी लेखण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातूनच शॉर्टकट काढून त्याची बदनामी केली जाते, टिका केली जाते आणि या गोष्टीसाठी अनेकजण वेळ, पैसा खर्च करत असतात. अनेकांशी संपर्क साधत असतात आणि त्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी चंग बांधला जातो. वास्तविक त्या व्यक्तीपेक्षा पुढं जायचं असेलतर जे प्रयत्न करायला पाहिजे ते प्रयत्न केले जात नाहीत. त्यातून मत्सर भावनेतून त्याला नामोहरण करण्याचा प्रयत्न केला जातो. खरंतर माणसाचं जे जीवन आहे त्या जीवनात जे दु:ख येते ते दु:ख दु:खातून येत नाहीतर ते दुसऱ्याचे सुख पाहून दु:ख येते. त्याला ते मिळाले, मला का मिळत नाही; ही भावना मत्सराची भावना आहे. यातूनच मत्सर वाढत जातो.

मच्छर आणि मत्सर हे दोन शब्द परस्पर पूरक आहेत. मच्छर शरीराला बाहेरून चावतो आणि मत्सर हा आतून टोचत असतो. बाहेरचा मच्छर हाकलवता येतो, मच्छरदाणी, गुडनाईट, ओडोमास लावून त्याला आपण पळवून लावू शकतो. पण आतल्या मत्सराचे काय ? शेजाऱ्यानं जर चांगली गाडी घेतली की आपल्या पोटात दुखायला लागतं. हे पोटात दुखणे म्हणजेच मत्सर होय. शेजाऱ्याचे वाढलेले सुख हे आपल्या दु:खाचे कारण ठरते. शेजाऱ्याचा मुलगा ऑफिसर बनला आणि आपला मुलगा बेकार असेलतर त्याचे दु:ख फार मोठे असते. जगात अशीही माणसं असतात, जे सुंदर आयुष्याकडे दुर्लक्ष करतात आणि सतत दुसऱ्याचा मत्सर करण्यात आयुष्यातील सुंदर क्षण वाया घालवतात. माणसाची अशी एक अवस्था आहे की त्या अवस्थेत माणूस हा काम विसरतो, फोन विसरतो, लोभ विसरतो; परंतु मत्सर मात्र विसरत नाही हे त्याचे दुर्दैव आहे.

खरंतर असं सांगितलेलं आहे, की जो दुसऱ्याच्या सुखात आनंदी असतो तोच खरा समृध्द होतो. पण आपलं मन त्याला साथ देत नाही. एक विचार झोपेच्या रात्रभर चिंधड्या करतो हे माहित असूनही आपण मात्र त्याकडे दुर्लक्ष करतो. खरंतर एखाद्याच्या यशाचं अनुकरण केलं, त्यासाठी परिश्रम घेतले आणि त्यातून यश मिळवलं तर आपलं जीवन समृध्द होतं. पण माणूस कष्ट करायला पुढं धजावत नाही आणि त्या माणसाला खाली खेचण्यासाठी, कमीपणा आणण्यासाठी बदनामीचं हत्यार वापरतो. या मत्सराने खरंतर आमचे खूप मोठे नुकसान होते. गायीचे दुध पवित्र आहे, पण ते जर खराब भांड्यात ठेवलेतर दूध नासते. तसेच आपल्या शरीराचे आहे. आपले शरीर पण पवित्र आहे, पण त्यात मत्सर आला की आपले शरीर अपवित्र होते.

कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनी १९२७ ला सवती मत्सर हे नाटक लिहिले. विशेष म्हणजे त्या काळात हे नाटक खूप गाजले. या नाटकाने आम्हाला पाहिजे ते इतरांना नको, तो मत्सर ते शिकवले. या नाटकात राजेश नावाचा कुटूंबप्रमुख असतो. तो श्रीमंत असतो, सरला ही त्याची पहिली पत्नी असते आणि प्रिया ही दुसरी पत्नी असते. दोघींमध्ये स्पर्धा सुरू होते आणि या स्पर्धेतून जो मत्सर अनुभवायला मिळतो तेच हे सवती मत्सर नाटक. पहिल्या पत्नीला हरविण्यासाठी दुसरी पत्नी प्रिया प्रयत्न करते आणि या दोघींच्या आयुष्यातील संघर्षाचे सर्व परिणाम राजेशला भोगावे लागतात. एका लोकप्रिय नाटकाने कुटूंबातील मत्सर कुटूंबाची बरबादी कशी करतो, हे दाखवून दिले आहे.

मत्सर हा एक भाव आहे आणि तो भाव न संपणाऱ्यातला आहे. याबाबत एकजण साधु महाराजाकडे गेला आणि म्हणाला.., "महाराज मत्सर घालविण्यासाठी काय केलं पाहिजे ?" त्यावेळी महाराज म्हणतात..," एक मधुमेहाचा पेशंट डॉक्टरांकडे जातो आणि डॉक्टरांना सांगतो माझा मधुमेह घालवा !" तेव्हा डॉक्टर म्हणतात.. "मधुमेह जात नसतो; पण याबरायचे काही कारण नाही. गोळ्या औषधाने तो कंट्रोल होतो." तसाच मत्सर हा जात नाही. पण सत्संग, संतांचे विचार आणि साधू संतांचे अनुकरण, ग्रंथांचे वाचन यातून मत्सर कंट्रोल होतो.

आणखीन एक म्हणजे जीवनात दुसऱ्याच्या यशाचे, गुणाचे, चांगल्या गोष्टीचे सेलिब्रेशन करायला शिकले पाहिजे. मग मत्सर वाढत नाही उलट प्रेम वाढते. आयुष्यात भोगापेक्षा त्याग, लोभा पेक्षा दात आणि मत्सरापेक्षा आपुलकी ही निश्चितच महत्वाची आहे.

पान १ वरून पुढे..

## सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आंदोलन

संजयमामा शिंदे यांचे स्वीय सहाय्यक विकास वीर यांच्या उपस्थितीत हे आंदोलन संपन्न झाले. या आंदोलनात हनुमंत मांढरे, विलासकाका राऊत, भाजपाचे गणेश चिवटे, शितल क्षीरसागर, विकास वीर व ज्येष्ठ पत्रकार विवेकराव येवले यांची भाषणे झाली. यावेळी विकासकामाला लोकप्रतिनिधीकडून अडथळा येत आहे; असा सूर आवळत अधिकाऱ्यांना कोणाचा दबाव आहे का ?, ज्यांनी काम अडवले त्यांच्यावर शासकीय कामकाजात अडथळा आणल्याचा गुन्हा का दाखल होत नाही ?, ज्यांनी पाईप जाळले त्यांचा शोध घेऊन त्यांना अटक का केली जात नाही ?.. अशा मागण्या करण्यात आल्या. यावेळी पोलीस उपनिरीक्षक रोहित शिंदे यांनी सदर गुन्ह्यातील आरोपींना शोधून लवकरात लवकर अटक करू; असे सांगितले. तर उपविभागीय अधिकारी श्री.राजगुरू यांनी लेखी पत्र देत हे बंद पडलेले काम ३० मे पासून सुरू करू; असे आश्वासन दिले. त्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

स्थलांतर..
३० वर्षापासून आपल्या अखंड सेवेत..
स्थलांतर..
शांतिसागर
बँगल्स स्टोअर
हे दुकान..... स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा येथे चालू आहे.
बांगड्याचे होलसेल व्यापारी


आपल्या लाडक्या मुला-मुलींच्या लग्नासाठी लागणाऱ्या बांगड्या होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण !
संपर्क : मो.नं.9766075378
पत्ता : स्टेट बँकेशेजारी, राशिनपेठ, करमाळा

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with OKEN Scanner







Scanned with OKEN Scanner







# दहावीच्या परीक्षेत कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयाची सई तनपुरे तालुक्यात प्रथम




करमाळा(सं.प्र.): दहावीच्या परीक्षेत कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयाचा ९२.४५ टक्के निकाल लागला असून, सई लहू तनपुरे हिचा ९७.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात व करमाळा तालुक्यात प्रथम क्रमांक आला आहे.

श्रृती सतीश चव्हाण (९५.६० टक्के) हिचा विद्यालयात द्वितीय तर सक्षम सुनिल वाघमारे (९४.०० टक्के) याचा तृतीय क्रमांक आला आहे. समृध्दी नागेश विद्वत (९३.८० टक्के) हिचा चौथा क्रमांक तर दिक्षा विलास शिंदे व साक्षी संजित रंदवे यांचा ९३.६० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक आला आहे.

सई तनपुरे, श्रृती चव्हाण, साक्षी रंदवे यांना कोणतीही बाहेरील शिकवणी नसून फक्त विद्यालयातील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन मुख्याध्यापक सुनील जाधव यांचेसह उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले

दहावीच्या परीक्षेत यश प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार प्रशालेच्या वतीने करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद तसेच पालक वर्ग उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन जगदाळे सर यांनी केले. उपस्थितांचे आभार धनवे सर यांनी मानले.



दहावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद




Scanned with OKEN Scanner

# दहावीच्या परीक्षेत म.गांधी विद्यालयाचा ९०.९० टक्के निकाल

प्रथम | द्वितीय | तृतीय | चौथा | चौथा | पाचवा



करमाळा(सं.प्र.) : दहावीच्या परीक्षेत महात्मा गांधी माध्यमिक, उच्च माध्यमिक व तांत्रिक विद्यालयाचा ९०.९० टक्के निकाल लागला असून प्रथमेश भागवत गर्जे याचा ९७.०० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम क्रमांक आला आहे. व्दितीय क्रमांक अर्चित धनंजय वीर (९५.८० टक्के), तृतीय क्रमांक सार्थक उत्कर्ष गांधी (९५.६० टक्के), चौथा क्रमांक तेजस विक्रम राऊत व जोहारोमान अनिस बागवान (९५.४० टक्के), पाचवा क्रमांक अनुष्का मुन्नेश जाधव (९४.८० टक्के) हिचा आला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, विश्वस्त वैभवराजे जगताप, शंभुराजे जगताप, प्राचार्य बी.के.पाटील, उपप्राचार्य अनिस बागवान, पर्यवेक्षक नवले मॅडम, भोसले सर, विभाग प्रमुख विजय पवार यांनी केले. विद्यालय तर्फे यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



म. गांधी विद्यालयातील पायल बापू ओहोळ या विद्यार्थीनीने मराठी विषयात ९८ गुण मिळवत पुणे विभागीय बोर्डात प्रथम येण्याचा मान मिळवला. पायल ही अत्यंत गरीब परिस्थितीतून शिकत होती. दररोज २५ किलोमीटर एस.टी.ने प्रवास करून तिने हे यश संपादन केले आहे. तिचे वडील बांधकाम मजूर म्हणून काम करतात. तिला प्रा.विजय पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेचा शंभर टक्के निकाल



करमाळा(सं.प्र.) : यावर्षी नवीनच मान्यता मिळालेल्या करमाळा शहरातील नगरपालिकेच्या कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेचा पहिल्याच प्रयत्नात दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे. मिस्बा याकुब कुरेशी याने ८८ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला. साबिया सादिक शेख (८५ टक्के), रफिया अकील शेख (७७ टक्के) यांचे अनुक्रमे व्दितीय व तृतीय क्रमांक आले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन मुख्याध्यापक जुबेर जानवडकर, सर्व शिक्षक वृंद यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षक वर्ग, सनराईस क्लासचे प्रा.इब्राहिम मुजावर सर व पालक या सर्वांच्या मदतीने व मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

# म.ज्योतीराव फुले विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

करमाळा(सं.प्र.) : दहावीच्या परीक्षेत मोरवड येथील महात्मा ज्योतीराव फुले विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला असून हनुमंत नामदेव नाळे व साक्षी राजेंद्र नाळे (९३.६० टक्के) यांचा विद्यालयात प्रथम क्रमांक आला आहे. द्वितीय क्रमांक अमोल रमेश कुऱ्हाडे (८.८० टक्के), तृतीय क्रमांक यशराज दादासाहेब काळे (८०.६० टक्के), चौथा क्रमांक ओम दत्तात्रय काळे (७८.६० टक्के), पाचवा क्रमांक तनुजा रामचंद्र नाळे (७८.४० टक्के) हिचा आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन वसंत मोहोळकर, मुख्याध्यापक नवनाथ मोहोळकर, सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी केले.

खुशखबर दर सोमवारी मुळव्याध इंजेक्शन (Scelro - Theropy) खुशखबर

फक्त 10,000/- मध्ये पहिल्या पाच पेशंटसाठी मर्यादित !

डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवारी उपलब्ध

बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ

डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)

उपलब्ध सुविधा...

• मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब • एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब • संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे • संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा • संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर • चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण

दर गुरूवार व सोमवार

वेळ : सकाळी ९.०० ते १२.००

लोकरे हॉस्पिटल

कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर

(९८५०८५१००५)

मो.9763035862

परिचय

डॉ.विकास देविदास नागरगोजे

मुळव्याध तज्ञ

पदवी : नाशिक

पदवोत्तर : मुंबई

ओपीडीचे वैशिष्ट्ये...

• इंजेक्शन सुविधा • लेझर सुविधा • प्रभावी औषधी सुविधा • मेडिक्लेम सुविधा उपलब्ध • मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग • आठवड्यातून दोनदा ओपीडी • पार्किंगची व्यवस्था

सुचना १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# दहावीच्या परीक्षेत नवभारत इंग्लीश स्कुलचा १०० टक्के निकाल

प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | चौथा क्रमांक | पाचवा क्रमांक



करमाळा (सं.प्र.): श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मिडीयम स्कुलचा दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला असून स्कुलने पुन्हा एकदा उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. पौर्णिमा जयवंत चौरे हिने ९६.६० टक्के गुण मिळवत स्कुलमध्ये प्रथम येण्याचा तसेच गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून पुणे बोर्डात प्रथम येण्याचा मान मिळवला. केदार महेश अभंग (९२.६० टक्के), राजनंदिनी मंगेश मुरूमकर (८७.६० टक्के), कृष्णा शिरीष अगरवाल (८७.६० टक्के), वैभव महादेव सुपे (८३.८० टक्के) यांचे अनुक्रमे व्दितीय, तृतीय, चौथा व पाचवा क्रमांक आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन स्कुलच्या सर्वेसर्वा सुनिता देवी तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी केले.

# श्री गिरधरदास देवी विद्यालयाचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

करमाळा(सं.प्र.) : येथील श्री गिरधरदास देवी विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. समृध्दी विक्रम साळवे हिने ९४.६० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. द्वितीय क्रमांक समृध्दी संतोष अडसुळ (९३.२० टक्के), तृतीय क्रमांक सुप्रिया भागवत बरडे (९२.०० टक्के), चौथा क्रमांक सोमनाथ बबन इरकर (८७.४० टक्के), पाचवा क्रमांक प्रमिला गोरख पवार (८५.८० टक्के) हिचा आला आहे. देवी विद्यालयाचा एकूण निकाल ९३.०२ टक्के लागला



असून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठानचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, सचिव अमोदशेठ संचेती, संचालिका सुनिता देवी, चंद्रकांत देवी, विजयकुमार दोशी, मुख्याध्यापक संभाजी जगताप, सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी केले.

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्

सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502

पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.

• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण

कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.

मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.

प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

पुनम एजन्सी

अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक

• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर

स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट

होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल

प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

Scanned with OKEN Scanner



# श्वेता गिफ्ट & टॉईज

लहान मुलांसाठी सर्व प्रकारची **खेळणी व भेटवस्तू** डिस्काऊंट प्राईज मध्ये उपलब्ध !

सर्व प्रकारच्या बॅटरी ऑपरेटेड **थार (जीप) व कार** मिळतील.

टीप : बॅटरी ऑपरेटेड कार विक्री व दुरूस्ती





## चिमुकल्यांच्या

आनंदात भर पडेल असे गिफ्ट वाढदिवसाला द्या..!

- इलेक्ट्रीक कार
- इलेक्ट्रीक बाईक

श्रीराम मंदिर शेजारी, वेतालपेठ, करमाळा.
मो.9822058106

**Shweta** Gift & Toys



प्रथम क्रमांक



अथर्व अमोल राठोड (96.20%)

"उज्वल भविष्याची गरुडझेप येथूनच !"

# डी.जी.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, करमाळा

ता.करमाळा, जि.सोलापूर

द्वितीय क्रमांक



सुजल बापू दौंडे (91.60%)

**100%** निकालाची यशस्वी परंपरा !

● इ.१० वी मार्च-२०२५ एकूण निकाल १००% ●



| मुख्याध्यापक | शाळा व्यवस्थापक | शिक्षक | शिक्षक |
|---|---|---|---|
| श्री.शिवाजी गायकवाड | श्री.किरण शेंदरकर | श्री.माधव गायकवाड | श्री.अमोल पाटील |

शिक्षक — श्री.अनंत शेळके

- आर.डी.लावंड
- कोमल गायकवाड
- योगिता सोनके
- राधिका होनकळसे
- सुचिता शिरसट
- नूतन रणसिंग
- चित्तरंजन सुरवसे

नर्सरी ते १० वी (सेमी इंग्रजी) प्रवेश सुरू..!

मार्गदर्शक — श्री.बापुराव काटकर

● संपर्क ●
शिवाजी गायकवाड-9607210033, किरण शेंदरकर-7276676770, बापूराव काटकर-7387637146





धर्मवीर वैद्यकिय मदत सामाजिक संस्था ठाणे संचलित
College Code : 1384

# श्रीमती गंगुबाई संभाजी शिंदे इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (कॉलेज), करमाळा.

## ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी 'नर्सिंग' क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी !

**G.N.M. डिप्लोमा कोर्स** प्रवेश देणे सुरू

- कालावधी : ३ वर्षे
- शैक्षणिक पात्रता... १२ वी पास (सायन्स/कॉमर्स/आर्टस्)

मान्यताप्राप्त..

- महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक मंडळ, मुंबई
- महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई

- १००% नोकरीची हमी
- सर्व शासकीय शिष्यवृत्तींचा लाभ
- फक्त मुलींसाठी मोफत प्रवेश..
- जॉब प्लेसमेंट
- हॉस्टेल सुविधा
- हॉस्पीटल व्हिजीट्स व प्रशिक्षण
- इंग्लिश स्पीकींग क्लासेस



सुविधा...

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, शासकीय, निमशासकीय परदेशात, नगरपालिका, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय, खाजगी रूग्णालय, जिल्हा परिषद रूग्णालयामध्ये १००% नोकरीची सुवर्णसंधी !
- मुलींकरीता सर्व सोयीनीयुक्त होस्टेल व मेसची सुविधा.
- प्रात्यक्षिक व क्षेत्रीय अनुभवासाठी सुपर मल्टी-स्पेशालिटी रूग्णालय, मनोरूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालये.
- सुसज्ज लॅब, इमारत, भव्य ग्रंथालय, सुसज्ज कॉम्प्युटर लॅब.
- अनुभवी प्राध्यापक वर्ग, नामांकित हॉस्पीटलशी संलग्न नोकरीची हमी.
- एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांना (शासकीय नियमानूसार) १००% शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध.

पत्ता : अमरनाथ टॉवर, तिसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. फोन : (०२१८२)२११५४७, ९५४५६२०१११



२४ तास आपल्या सेवेत

# मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे चॅरिटेबल हॉस्पिटल, करमाळा.

**डॉ.ओंकार अभिमन्यु उघडे-पाटील** M.B.B.S. (Gen.Physician) यांचे तज्ञ मार्गदर्शन व तपासणी

सुविधा : अॅडमीट, ऑपरेशन व सर्व रोगनिदान
मेंदू-मणका व गुडघे/संधिवात, त्वचारोग, स्त्रीरोग तज्ञ

टीप : दर आठवड्याला तज्ञ डॉक्टरांची व्हीजीट सेवा

तपासणी फी फक्त Rs.100/-

पत्ता : अमरनाथ टॉवर, दुसरा मजला, श्रीदेवीचामाळ रोड, करमाळा. मो.८४४६१३९५९३


Scanned with OKEN Scanner

# स्वयंपाकी पाहिजे

मातोश्री वृध्दाश्रम (पांडे) येथे स्वयंपाकासाठी महिला पाहिजे
**राहणे व खाण्याची सोय शिवाय योग्य मानधन मिळेल.**
इच्छुक महिलांनी संपर्क साधावा..!

**संपर्क : मो.नं.9689664994**



आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

**✲ काशी दर्शन यात्रा ✲**
काशी, गया, अयोध्या, प्रयाग,
दि. २५/०७/२०२५ ते ०२/०८/२०२५
सहल खर्च - १४८००/-

**✲ कन्याकुमारी ✲**
कन्याकुमारी,त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्
दि. ११/०८/२०२५ ते १८/०८/२०२५
सहल खर्च- १००००/-

**✲ वैष्णोदेवी दर्शन यात्रा ✲**
वैष्णोदेवी, अमृतसर,आग्रा,मथुरा, गोकुळ,वृंदावन,
दि. ०९/०९/२०२५ ते १८/०९/२०२५
सहल खर्च १३८००/-

**✲ केरळ दर्शन ✲**
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार, त्रिवेंद्रम मदुराई, रामेश्वरंम,कन्याकुमारी
दि. २३/१०/२०२५ ते ०४/११/२०२५ रेल्वेप्रवास
सहल खर्च ३३०००/- 3 AC

**✲ गंगासागर दर्शन ✲**
गंगासागर, कलकत्ता, श्री जगन्नाथपुरी धाम कोणार्क, भुवनेश्वर, साक्षीगोपाल
दि. १६/११/२०२५ ते २४/११/२०२५
सहल खर्च १२८००/-

**✲ २ ज्योतिर्लिंग दर्शन यात्रा ✲**
उज्जैन, ओंकारेश्वर, मंडलेश्वर, महेश्वर, इंदौर
दि. ०३/०८/२०२५ ते ०८/०८/२०२५
सहल खर्च- ८५००/-

**✲ तिरुपती बालाजी दर्शन विमान यात्रा ✲**
तिरुपती बालाजी, गोविंदराज, पद्मावती माता
दि. १९/०८/२०२५ ते २२/०८/२०२५
सहल खर्च ९९९९/-

**✲ चारधाम यात्रा ✲**
गंगोत्री, यमुनोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ हरिद्वार, ऋषीकेश
दि. ०३/१०/२०२५ ते १७/१०/२०२५ रेल्वेप्रवास
सहल खर्च ३५०००/- 3 AC

गिरनार पर्वत, जुनागड,
सोरटी सोमनाथ, पोरबंदर, नागेश्वर ज्योतिर्लिंग, द्वारकाधाम
दि. ०६/११/२०२५ ते १३/११/२०२५
सहल खर्च- ११५००/-

**✲ नेपाळ ✲**
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, मनोकामना, काठमांडू, लुंबिनी, अयोध्या, प्रयागराज
दि. ०५/१२/२०२५ ते १८/१२/२०२५ रेल्वेप्रवास
सहल खर्च २७५०० /- 3 AC

✲ रेल्वे प्रवास, बस प्रवास, भोजन व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय

अधिक माहितीसाठी संपर्क
**8888333638/8698333638 / 7218333638**


## दहावीच्या परीक्षेत दत्तकला आयडियल स्कुलचा शंभर टक्के निकाल





करमाळा(सं.प्र.) : केत्तूर नं.१ येथील दत्तकला शिक्षण संस्थेचे दत्तकला आयडियल स्कुल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजाचा दहावीच्या परीक्षेत सलग ११ व्या वर्षी शंभर टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत विद्यालयातील राज पांडुरंग खाटमोडे (९५.४० टक्के), आर्या आप्पासाहेब बाबर (९३.२० टक्के), प्राची प्रशांत देशमुख (८८.८० टक्के) यांचे अनुक्रमे प्रथम, व्दित्तीय व तृतीय क्रमांक आले आहेत. वाशिंबे केंद्रात सेमी इंग्रजी माध्यमातून राज खाटमोडे याने ९५.४० टक्के गुण मिळवून केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच त्याला गणित व विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयात अनुक्रमे १०० पैकी ९८ व ९६ गुण मिळाले आहेत. प्रशालेचे तब्बल सात विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, दोन विद्यार्थी प्रथम श्रेणीत पास झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, प्राचार्य विजय मारकड, सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी केले.

## दहावीच्या परीक्षेत प्रतिज्ञ भूषण दुनाखे भारत विद्यालयात प्रथम



करमाळा (सं.प्र.) : जेऊर येथील भारत विद्यालयातील विद्यार्थी प्रतिज्ञ भूषण दुनाखे यास दहावीच्या परीक्षेत ९६.४० टक्के (४८२) गुण मिळाले असून, त्याचा विद्यालयात प्रथम क्रमांक आला आहे. दुनाखे याने अत्यंत कठीण परिस्थितीतून अभ्यास करत हे यश मिळवले आहे. त्याचे वडील नारायण आबा पाटील पतसंस्थेत कर्मचारी आहेत. कोणताही जादा तास न लावता शाळेत शिकवलेल्या व घरी बसून केलेल्या अभ्यासावर ९६.४० टक्के गुण मिळवले आहेत. त्यामुळे त्याचे सर्व तालुक्यात कौतूक होत आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार नारायण (आबा) पाटील, उपाध्यक्ष राजुशेठ गादीया, सचिव प्रा.अर्जुनराव सरक, सरपंच पृथ्वीराज पाटील, प्राचार्य आबासाहेब सरोदे, उपप्राचार्य नागेश कांबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, सर्व शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी, नारायण पाटील पतसंस्थेचे चेअरमन परेशकुमार दोशी, सचिव प्रा.विलास ठोकळ, मॅनेजर शेख साहेब व सर्व संचालक यांनी अभिनंदन केले आहे.

## श्री कमलादेवी कन्या विद्यालयाचा ९२.९५ टक्के निकाल

करमाळा(सं.प्र.) : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित श्री कमलादेवी कन्या विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेत ९२.९५ टक्के निकाल लागला असून सृष्टी जाधव हिने ९३.०० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. द्वित्तीय क्रमांक साक्षी भुजबळ (८७.४० टक्के), तृतीय क्रमांक तेजस्वीनी जाधव (८३.०० टक्के), चौथा क्रमांक नम्रता कुंभार (८०.६० टक्के), पाचवा क्रमांक सोनाली हाके (८० टक्के) हिचा आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन स्वामी विवेकानंद शिक्षण मंडळाचे सर्व संचालक, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी केले.

## बिटरगाव सहकारी संस्थेचे चेअरमन मुरूमकर यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : बिटरगाव(श्री) येथील विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे चेअरमन लालासाहेब विनायक मुरूमकर (वय-६१) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने मध्यरात्री निधन झाले. लालासाहेब मुरूमकर हे विविध कार्यकारी संस्थेचे चेअरमन असून गेल्या आठवड्यात त्यांची सुन मनिषा नितीन मुरूमकर यांचे अपघाती निधन झाले होते. या दु:खातच मुरूमकर यांचे निधन झाल्याने मुरूमकर परिवारावर शोककळा पसरली आहे. मुरूमकर हे जगताप गटाचे कट्टर समर्थक होते. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे. अंत्यविधी प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# मॅनेजर व कामगार पाहिजेत

आमच्या दुकानासाठी विश्वासाने काम करणारा
● मॅनेजर ● हेल्पर ● संगणक ऑपरेटर(लेडीज)
पाहिजेत. गरजूंनी संपर्क करावा.

**संपर्क : मो.9960820300**



करमाळा शहरात प्रथम सुरू..! Reg no.42433
**डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील**
( Clinical Cosmetologist & Trichologist )

# पाटील स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक

उपलब्ध सुविधा




● **त्वचा :** P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोक्नीडलिंग, अँटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
● **केस :** P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
● सर्व आजारांवर उपचार ● रक्त लघवी तपासणी ● लहान मुलांना वाफ देणे ● सांधेदुखी, कंबरदुखी ● होमिओपॅथिक उपचार

**पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573**



# सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी
**२०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा !**


Scanned with OKEN Scanner



करमाळा शहरातील महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या परीक्षेत यश प्राप्त केलेल्या गुणवंतांचा सत्कार विद्यालयाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित शिक्षक, शिक्षिका, गुणवंत विद्यार्थी व पालक वर्ग













Scanned with OKEN Scanner

करमाळा भूषण



दि करमाळा अर्बन को.ऑप बँक लि; च्या पंचवार्षिक निवडणुकीत

**श्री.कन्हैयालाल गिरधरदास देवी**
**श्री.अनुज कन्हैयालाल देवी**

हे विक्रमी मताने विजयी होऊन त्यांची संचालक पदी निवड झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**



नूतन संचालक    नूतन संचालक



शैक्षणिक वर्ष 2024 - 2025

श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित

## श्री गिरधरदास देवी विद्यालय, करमाळा.

**इ.१० वी च्या परीक्षेत 93.02% निकाल**

प्रथम क्रमांक    प्रथम क्रमांक    प्रथम क्रमांक



कु.समृध्दी विक्रम साळवे (९४.६० टक्के)



कु.समृध्दी संतोष अडसुळ (९३.२० टक्के)



कु.सुप्रिया भागवत बरडे (९२.०० टक्के)

इ.१० वीच्या परीक्षेत यश प्राप्त केलेल्या श्री गिरधरदास देवी विद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे

**हार्दिक अभिनंदन !**

टीप : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ इ.५ वी व इ.८ वी सेमी माध्यम व मराठी माध्यम प्रवेश देणे सुरू आहे..!

शुभेच्छुक

मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद

## श्री गिरधरदास देवी विद्यालय, करमाळा

## कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय

करमाळा., जि.सोलापूर

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६



प्रशालेची खास वैशिष्ट्ये

**इ.5 वी ते 9 वी सेमी मोफत प्रवेश !**

- इ.१० वी निकालाची वैभवशाली परंपरा
- तज्ञ व अनुभवी शिक्षक वृंद
- गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व वह्या वाटप
- नवोदय, स्कॉलरशीप, गणित संबोध, विज्ञान संबोध, चित्रकला, ग्रेड परीक्षा, खेळाचे मार्गदर्शन अशा विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन.
- प्रशालेची इमारत व परिसर सीसीटीव्हीच्या कक्षेत.
- मुलींच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथक, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा समितीचे प्रभावी आयोजन
- इ.१० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, रात्र अभ्यासिका., गणित, सायन्स, इंग्रजीचे रोज जादा तास तसेच उन्हाळी सुट्टीत व्हॅकेशन.
- ई-लर्निंग सुविधा (डिजीटल वर्ग)
- सुसज्ज इमारत व भव्य खेळाचे मैदान

संपर्क

**श्री.सुनील जाधव** (मुख्याध्यापक) मो.9921451011
**श्री.रविंद्र शिंदे** (क्लार्क) मो.8605047554
**श्री.अर्जुन जगदाळे सर** मो.9881024867
**श्री.विजय धनवे सर** मो.9423333967

यशाची मानकरी



**10 वी च्या परीक्षेत तालुक्यात प्रथम**

करमाळा शहरातील कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालयातील विद्यार्थीनी

**कु.सई लहु तनपुरे**

हिने दहावीच्या परीक्षेत 97.80 टक्के गुण मिळवून **करमाळा तालुक्यात प्रथम क्रमांक** पटकाविल्याबद्दल...

हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

## भागवत परिवार, करमाळा.

Scanned with OKEN Scanner

# सावडी येथे मोटारसायकलला धडक देऊन जातीवाचक शिवीगाळ

करमाळा(सं.प्र.) : मोटारसायकलला ट्रॅक्टर चालकाने धडक देऊन अपघात केला शिवाय जखमींना जातीवाचक शिवीगाळ करून बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार सावडी येथे ११ मे ला सायंकाळी चारच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी निकत जया काळे (रा.पारेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, मी पारेवाडी येथे मोटारसायकल वरून जात होतो. माझ्या सोबत माझी पत्नी माधवी व मुलगी आरोही असे तिघेजण होतो. सावडी फाट्याजवळ आल्या नंतर बिगर नंबरच्या सोनालिका ट्रॅक्टरने माझ्या मोटारसायकलला धडक दिली. त्यात आम्ही जखमी झालो. त्यानंतर त्या ट्रॅक्टर चालकाकडे जाऊन ट्रॅक्टरची चावी काढून घेतली असता, ट्रॅक्टर चालकाने आणखी तिघांना बोलावून घेऊन चौघांनी मिळून आम्हांस जातीवाचक शिवीगाळ केली व मारहाण केली. माझ्या बहिणीला बोलावून घेतले असता, तिलाही मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी पप्पू प्रल्हाद एकाड वगैरे चौघांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.


# खुली जागा भाड्याने देणे आहे

करमाळा शहरापासून जवळ, नालबंद मंगल कार्यालय जवळ, नगर बायपास चौक येथील सर्व सोयीनेयुक्त असलेली १ गुंठा ते १०, २०, ८० गुंठ्यापर्यंतची खुली जागा मॉल, शोरूम, गोडावून, छोटे उद्योग, कारखाने, दूध संघ, खते गोडावून, दाळ मिल कोल्ड स्टोरेज इ. सर्व प्रकारच्या उद्योगासाठी योग्य दराने भाडेतत्वावर देणे आहे

जागेची वैशिष्ट्ये : • नगर-करमाळा हायवे पासून २०० फुटावर • ५० फुटी रोड टच • २४ तास लाईटची सोय

संपर्क : मो.नं.8805737388


# जेऊर येथून मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : जेऊर येथून घरासमोर लावलेली मोटारसायकल चोरट्याने चोरून नेली आहे. हा प्रकार ९ मे च्या मध्यरात्री घडला आहे. या प्रकरणी समीर रफिक पटेल (रा.जेऊर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्या मालकीची होंडा युनिका कंपनीची एमएच ४५ एपी ६७९६ ही मोटार-सायकल जेऊर येथून राहत्या घरासमोरून ९ मे ला रात्री पावणे अकरा वाजता लावली होती. १० मे ला सकाळी पाहिले असता तिथे मोटारसायकल दिसेनाशी झाली. शोध घेऊनही मोटारसायकल न सापडल्याने त्याची चोरी झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

## टिपर-कारच्या धडकेत
# कार मधील तिघेजण जखमी

करमाळा (सं.प्र.) : दारू पिवून टिपर चालवून कारला धडक दिली. त्या अपघातात कार मधील तिघेजण जखमी झाले आहेत. हा अपघात ११ मे ला सायंकाळी पावणेसात वाजता मांजरगाव येथे घडला आहे. या प्रकरणी राहुल रमेश घोगरे (रा.शेलगाव वांगी, ह.रा.पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ११ मे ला मी टाटा नॅक्सोन कंपनीच्या कारने माझ्या गावी शेलगाव (वांगी) येथे आलो होतो. माझे काम उरकून परत पुणे कडे जात असताना मांजरगाव जवळ सायंकाळी पावणेसातच्या सुमारास दहा टायरचा टिपर एमएच १६सीपी ४८१३ च्या चालकाने टिपर हा वेडावाकडा चालवत येऊन आमच्या कारला त्याने धडक दिली. त्यामुळे आमची गाडी रस्त्याच्या खाली जाऊन पलटी झाली. त्यामुळे माझ्या मानेला लागले तर माझी पत्नी किशोरी हिच्या डाव्या पायाला तर मुलगा सत्यम याच्या डाव्या हाताला मार लागून आम्ही जखमी झालो आहोत. सदर चालकाने मद्यप्राशन करून टिपर चालवला होता.

# डॉ.राम बिनवडे यांना अटकपूर्व जामीन मंजूर

करमाळा(सं.प्र.): प्रसुती दरम्यान महिलेच्या मृत्यूप्रकरणी करमाळा न्यायालयाच्या आदेशावरून शहरातील डॉ.राम बिनवडे यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत डॉ.बिनवडे यांनी अटकपूर्व जामिनासाठी आणि गुन्हा दाखल करण्याच्या करमाळा न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती मिळवण्यासाठी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात अर्ज केला होता. याबाबत बार्शी न्यायालयात सुनावणी होऊन संबंधित डॉक्टरला दिलासा मिळाला आहे.

डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे व हलगर्जीने पत्नीचा मृत्यू झाल्याचे नमूद करत रावगाव येथील भाऊसाहेब करगळ यांनी करमाळा न्यायालयात खासगी फिर्याद दाखल केली होती. याबाबत न्यायालयाने डॉ.राम बिनवडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले होते. यानंतर डॉ.बिनवडे यांनी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी आणि करमाळा न्यायालयाचा आदेश रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केला. यावर बार्शी न्यायालयाने डॉ.बिनवडे यांना अटकपूर्व जामीन मंजूर करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करून तपास करण्याच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. डॉ.राम बिनवडे यांनी ॲड.निखिल पाटील व ॲड.प्रमोद जाधव (करमाळा) यांच्या मार्फत बार्शी येथील न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी व न्यायालयीन आदेशाला स्थगिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. न्यायाधीश एस.एल.चव्हाण यांचे समोर अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी झाली. यावेळी युक्तीवाद करताना त्यांच्या वकिलांनी जिल्हा मेडिकल बोर्ड व उपजिल्हा मेडिकल बोर्ड येथे त्यांची तज्ञ डॉक्टरांमार्फत चौकशी चालू आहे व अद्याप चौकशी अहवाल आला नसल्याचे सांगितले. हा अहवाल येईपर्यंत त्यांच्या विरोधात खासगी फिर्याद दाखल करता येणार नाही. त्यासाठी सर्वोच न्यायालयाच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने जेकब मॅथ्यूज विरूध्द स्टेट ऑफ पंजाब या न्यायनिर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचा दाखला दिला. युक्तीवाद ग्राह्य धरून डॉ.राम बिनवडे यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. तसेच अहवाल आल्याशिवाय गुन्हा दाखल करू नये; असे न्यायालयाने म्हणून आदेशास तुर्तास स्थगिती दिली आहे.

# वरकुटे येथे अपघात - एकाचा मृत्यू

करमाळा(सं.प्र.): बेंगलोर येथे वडिलांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर त्यांचे अंत्यविधी उरकून गुजरातकडे परत येत असताना झालेल्या अपघातात मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हर्षद योगी (वय-३५) असे मृताचे नाव आहे. हा अपघात वरकुटे येथे पहाटे साडेचार च्या सुमारास १३ मे रोजी घडला आहे. या अपघातात चार जण जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. कुर्डूवाडी वरून येत असताना वरकुटे नजीक कार आली असता रस्त्याच्या कडेला लिंबाच्या झाडावर जाऊन कार आदळली. या अपघाताची खबर स्थानिकांनी पोलीसांना दिली.

# कमलादेवी मंदिर जीर्णोध्दाराच्या कामास १५ हजार रू. देणगी प्राप्त



करमाळा(सं.प्र.) : श्री कमलादेवी मंदिर जतन व संवर्धनाच्या कामास करमाळा येथील रोहन राजेंद्र महाजन यांनी ११ हजार रूपये देणगी मंदिर समितीकडे सुपूर्त केली आहे. तसेच जातेगाव येथील महादेव रामा शिंदे यांनी ५ हजार रूपयाची देणगी मंदिर जिर्णोध्दार कामासाठी दिली आहे. यावेळी रोहन महाजन व महादेव शिंदे यांचा कमलादेवी मंदिर समितीच्या वतीने कमलादेवीची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे सर्व सदस्य, पुजारी सहदेव सोरटे, व्यवस्थापक अशोक गाठे, भाऊसाहेब फुलारी व शिंदे, महाजन परिवार उपस्थित होते.





मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस व सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी

आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर, प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.

बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

डॉ.साळुंके स्कीन केअर क्लिनीक

त्वचा रोग निदान व उपचार



डॉ.रोहीत दिगंबरराव साळुंके
B.A.M.S., D.Derma(Ay)(Pune)
सौंदर्य समस्या, त्वचा व केशविकार, ॲलर्जी लैंगिक समस्या, गुप्तरोग तज्ञ

त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, सोयरायसिस, काळे डाग, पिंपल्स, चाई, कोड, स्ट्रेच मार्क, केस गळती, केसातील कोंडा, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या, नखांचे आजार, सुरमा

वेळ सकाळी १० ते दुपारी २ व सायं.४ ते ८ पर्यंत (रविवारी सुट्टी राहील.)

युनियन बँकेच्या शेजारी, कमलादेवी रोड, करमाळा. (9404692188, 7387376531)

श्री गजानन अगरबत्ती

• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)





नूतन संचालक



दि करमाळा अर्बन को.ऑप.बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत

# श्री.चंद्रकांत पांडूरंग चुंबळकर

विक्रमी मताने विजयी होऊन त्यांची संचालक पदी निवड झाल्याबद्दल...

## हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

- श्री गणेश तरूण मंडळ, खडकपुरागल्ली, करमाळा.
- समस्त नामदेव शिंपी समाज, करमाळा.

शैक्षणिक वर्ष 2024 - 2025

उज्वल यशाची परंपरा कायम राखणारे एकमेव शाळा.

# गुरूकुल माध्यमिक विद्यालय, करमाळा.

**इ.१० वीच्या परीक्षेत 100% निकाल** | **सृष्टी फंड करमाळा तालुक्यात तृतीय**

इ.१० वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी



| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | चौथा क्रमांक | पाचवा क्रमांक | सहावा क्रमांक | सातवा क्रमांक | आठवा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सृष्टी मंगेश फंड (गुण - ९६.९०%) | सायली प्रदीप वडणे (गुण - ९३.२०%) | स्वराली मनीष पाटील (गुण - ९१.८०%) | देवेंद्र दादा जाधव (गुण - ९१.४०%) | श्रेया म. नलवडे (गुण - ९१.००%) | अलसिफा सा. सय्यद (गुण - ९०.८०%) | साक्षी रघुनाथ लगस (गुण - ९०.४०%) | आकाश आ. फुके (गुण - ९०.२०%) |

गुरूकुल माध्यमिक स्कुल मधील इ.१० वीच्या परीक्षेत यश प्राप्त केलेल्या

## सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक **गुरूकुल माध्यमिक विद्यालय** श्रीदेवीचामाळ-करमाळा. (अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद)

Scanned with OKEN Scanner

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना
श्रीजय नेत्र रुग्णालय
• मोतीबिंदू(Catract) आधुनिक मशिनद्वारे शस्त्रक्रिया
• डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
• Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे
M.S. Netra (Ayu) (Gold Medalist)
(नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
Reg no.1-77199-A
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते रात्री ९ (रविवार - सकाळी १० ते दु.२ पर्यंत)
श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करुन मिळतील.)
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३
रिसेप्शनीस्ट नेमणे आहे. गरजूंनी त्वरीत संपर्क साधावा !

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह
साऊथ इंडियन: इडली सांबर, उडीदवडा सांबर, उत्तप्पा, डोसा
नाष्टा: पुरी भाजी, मिसळ पाव, पोहे/उपमा, वडीवडा/शिरा
स्नॅक्स: पावभाजी, तवापुलाव, सँडविच, फिंगर चिप्स
चाट: पाणीपुरी, स्पे.भेळ, रगडा पॅटिस, राज कचोरी
स्विट: पेढा, बर्फी, लाडू, जामून, मैसुरपाक, काजू कतली
नमकिन: फरसान, शेव, स्पे.चिवडा, पापडी
डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

## करमाळा अर्बन बँकेवर पुन्हा एकदा कन्हैयालाल देवी - सर्वच्या सर्व जागेवर विजय




करमाळा(सं.प्र.) : करमाळा अर्बन बँकेवर नागरीक संघटना पुरस्कृत कन्हैयालाल देवी यांचा पॅनल पुन्हा एकदा प्रचंड मताने विजयी झाला आहे. १४ जागेसाठी झालेल्या निवडणुकीत सर्वच्या सर्व ठिकाणी देवी यांचे उमेदवार खूप मोठ्या फरकाने विजयी झाले आहेत. सुरूवातीला दुरंगी होणारी लढत ही एकेरी झाली. ही निवडणूक प्रा.रामदास झोळ यांच्या गटाकडून लढविण्याचा प्रयत्न झाला. परंतु त्यांनी शेवटच्या क्षणी ही निवडणूक लढविण्याचे रद्द केले. त्यामुळे १४ जागेसाठी झालेल्या निवडणुकीत फक्त ६ ठिकाणी अपक्ष उमेदवार उभे होते. त्यांना नगण्य मते पडली आहेत. या निवडणुकीचे निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक ए.एन.शिंदे व दिलीप तिजोरे यांनी काम पाहिले होते. निवडणुकीचे मतदान महात्मा गांधी विद्यालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेत झाले होते तर मतमोजणी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आली होती. उमेदवार व मिळालेली मते पुढीलप्रमाणे..

**भटक्या विमुक्त जाती जमाती :** गोरख जाधव (बिनविरोध) **सर्वसाधारण :** जितेश कटारिया - १४३८ (विजयी), कलीम काझी- १४३२ (विजयी) , चंद्रशेखर घोडेगावकर - १६५ (पराभूत), सुनिल घोलप - १४९५ (विजयी), अनुज देवी - १४७६ (विजयी), कन्हैयालाल देवी - १४९३ (विजयी), यशराज दोशी - १४९७ (विजयी), मलिक पिंजारी - १८२ (पराभूत), मोहिनीराज भणगे - १४५० (विजयी), ब्रह्मदेव लोंढे - ११९(पराभूत), अभिजीत वाशिंबेकर - १५०८ (विजयी), प्रकाश सोळंकी - १४८० (विजयी), ताराबाई क्षीरसागर - १४५८(विजयी) **महिला राखीव :** मीना करंडे - १५८२ (विजयी), नंदिनी घोलप - १०१ (पराभूत), प्रमिला जाधव - १५१२(विजयी) **इतर मागास प्रवर्ग :** दिलीप गानबोटे -१४५ (पराभूत), चंद्रकांत चुंबळकर -१४५१(विजयी), मलिक पिंजारी -९४ (पराभूत) **अनुसुचित जाती/जमाती :** वंदना कांबळे - १५६४ (विजयी), सदाशिव वाघमारे - १४२ (पराभूत)


आसिम सादिक बागवान
C.B.S.E. बोर्ड (९८.०६%)


महंमदसाद सायर बागवान
(९३.००%)


जोहारपोमान अनिस बागवान
(९५.४०%)

दहावीच्या परीक्षेत आसिम सादिक बागवान
महंमदसाद सायर बागवान, जोहारपोमान अनिस बागवान
यांनी उज्वल यश संपादन केल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
• जहाँगीर शेखलाल बागवान फ्रुट मर्चंट (कमिशन एजंट) मार्केट यार्ड, करमाळा., जि.सोलापूर
• समस्त बागवान जमात, करमाळा. जि.सोलापूर

## दहावीच्या परीक्षेत तालुक्यातील २३ विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

करमाळा(सं.प्र.) : दहावीच्या परीक्षेत करमाळा तालुक्यातील एकूण ५६ विद्यालयांपैकी २३ विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. तालुक्याचा ९३.७० टक्के निकाल घोषित झाला आहे. तालुक्यातून एकूण ३ हजार ६७ जणांनी परीक्षा दिली. निकालामधून ९३१ जणांना विशेष गुणवत्ता, १७८ जणांना श्रेणी एक, ७२१ जणांना श्रेणी दोन, २४४ जणांना पास श्रेणी प्राप्त झाली आहे. २ हजार ८७४ इतके विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुलांची उत्तीर्ण टक्केवारी ९१.१३ तर मुलींची ९६.९२ टक्के आहे.

शंभर टक्के निकाल लागलेल्या शाळा पुढीलप्रमाणे... न्यु इंग्लिश स्कुल वांगी, संगमेश्वर विद्यालय संगोबा, राजेश्वर विद्यालय राजुरी, नामदेवराव जगताप माध्यमिक विद्यालय झरे, न्यु इंग्लीश स्कुल वांगी नं.१, शरदचंद्रजी पवार विद्यालय वाशिंबे, शारदाताई पवार विद्यालय केम, अजितदादा पवार विद्यालय वडशिवणे, छत्रपती संभाजी विद्यालय निंभोरे, डॉ.हेडगेवार माध्यंमिक विद्यालय गौंडरे, वामनदादा बदे माध्यमिक विद्यालय उमरड, प्रगती विद्यालय मांगी, त्रिमुर्ती विद्यालय टाकळी, महात्मा ज्योतिराव फुले विद्यालय मोरवड, माध्यमिक विद्यालय पांडे, दत्तकला आयडियल स्कुल केत्तूर नं.१, अभिनव माध्यमिक विद्यालय वाशिंबे, नवभारत इंग्लिश स्कुल करमाळा, नोबेल इंग्लिश स्कुल, डी.जी.पाटील स्कुल करमाळा. गुरूकुल माध्यमिक विद्यालय पांडे, कृष्णाई इंटरनॅशनल इंग्लिश मेडिअम स्कुल, स्व.नामदेवराव जगताप न.पा.उर्दू शाळा करमाळा या २३ विद्यालयांचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

## भाळवणी येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती

करमाळा(सं.प्र.) : भाळवणी येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तानाजी फरतडे, मोहन राऊत, योगेश शिंदे, संजय पवार, दादा वाघमारे, अनिल पाडुळे, रोहित शिंदे, मनोज धेंडे, सचिन शिंदे आदीजण उपस्थित होते.

शिवरत्न ॲग्रो सर्व्हिसेस


फिनोलेक्स ड्रिप, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, स्प्रे पाईप, मोटर., सर्व प्रकारची खते, कीटकनाशक, तणनाशक, बी-बियाणे., एचटीपी स्प्रे पंप, बॅटरी पंप तसेच शेती उपयोगी सर्व साहित्याचे अधिकृत विक्रेते
• नवीन पत्ता •
बायपास चौक, उड्डाण पुलाजवळ, कमलादेवी रोड, करमाळा.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲण्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

Scanned with OKEN Scanner







Scanned with OKEN Scanner

# दहावीच्या परीक्षेत गुरूकुल माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल



करमाळा(सं.प्र.): दहावीच्या परीक्षेत गुरूकुल माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला असून, ९० ते १०० दरम्यान ८ विद्यार्थी व ८० ते ९० दरम्यान ९ विद्यार्थी तसेच सृष्टी फंड या विद्यार्थीनीचा९६.६० टक्के गुण मिळवत करमाळा तालुक्यात तृतीय व विद्यालयात प्रथम क्रमांक आला आहे. द्वित्तीय क्रमांक सायली प्रदीप वडणे (९३.२० टक्के), तृतीय क्रमांक स्वराली मनीष पाटील (९१.८० टक्के), चौथा क्रमांक देवेंद्र दादा जाधव (९१.४० टक्के), पाचवा क्रमांक श्रेया महेंद्र नलवडे (९१ टक्के), सहावा क्रमांक अलसिफा सादिकअली सय्यद (९०.८० टक्के), सातवा क्रमांक साक्षी रघुनाथ लगस (९०.४० टक्के), आठवा क्रमांक आकाश आजिनाथ फुके (९०.२० टक्के) याचा आला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्रशालेचे संस्थापक नितीन भोगे, सचिवा भोगे मॅडम तसेच मार्गदर्शक शिक्षक भगत मॅडम, बनसुडे मॅडम, सपकाळ मॅडम, सातव सर, घोगरे सर, शिंदे सर, जगताप सर, वाघमारे सर यांनी केले आहे.

# धर्मवीर संभाजी विद्यालयाचा ९५.७४ टक्के निकाल



करमाळा(सं.प्र.) : दहावीच्या परीक्षेत गौंडरे येथील धर्मवीर संभाजी विद्यालयाचा ९५.१७ टक्के निकाल लागला असून विक्रमादित्य नवनाथ गायकवाड याचा ९१.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक आला असून द्वित्तीय क्रमांक धनश्री अनिल पारेकर (९१.३० टक्के), तृतीय क्रमांक प्रतिक्षा दादासाहेब रोकडे (८९.६० टक्के) हिचा आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन मुख्याध्यापक बापू नीळ, शिक्षक यशवंत कोळेकर, हरिदास काळे, वैजिनाथ भोईटे, सुखदेव गिलबिले, अशोक जावळे, इंद्रजित मुळीक, उत्तम हनपुडे, संतोष पुराणे यांनी केले.

# मारूती मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी आर्थिक मदतीचे आवाहन

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील भाजी मंडई येथील श्री मारूती मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम चालू आहे. मंदिर देवस्थान समितीच्या वतीने चालू असलेले दुरूस्ती व डागडुजीचे काम प्रगतीपथावर असून भक्तांच्या देणगी रूपी सहकार्यातून या कामास सुरूवात केलेली आहे. भाविकांनी सढळ हाताने देणगी देऊन या कामास सहकार्य करावे; असे आवाहन श्री मारूती मंदिर देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे. देणगीसाठी सचिन दळवे सर (९१३०४८२१६७), कांबळे सर (९९६०९८५३५५), भिमराव इंगोले (९९६०८४११४३) यांच्याशी संपर्क साधावा.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ञ ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

# म्हणूनच म्हणतात तो शेतकरी राजा आहे.!
# ऊस जळूनही चाऱ्यासाठी फुकट न्या..!

करमाळा(सं.प्र.) : शेतकऱ्याला शेतकरी राजा का म्हणतात याची अनेक उदाहरणे आहेत. त्यापैकी नुकतेच करमाळा तालुक्यातील भगतवाडी येथील विक्रम जाधव या शेतकऱ्याने शेतकरी कसा राजा आहे हे दाखवून दिले आहे. गेल्या पाच दिवसाखाली अज्ञात व्यक्तीने त्यांचा एक एकर ऊस रात्रीचा पेटवून दिला. सकाळी शेतात गेल्यावर अर्धवट जळालेला ऊस पाहिला. आता या ऊसाचं करणार काय ? लगेच तो ऊस जनावरांना चाऱ्यासाठी उपयुक्त आहे म्हणून जाधव परिवाराने सोशल मिडीयावर आवाहन करून जळालेला ऊस जनावरांच्या चाऱ्यासाठी फुकट घेऊन जा.. ही बाब पाहिल्यानंतर शेतकरी हा निश्चितच राजा आहे हे सिध्द होते.

भगतवाडी येथील विक्रम जाधव याच्या शेतात जवळपास पाच एकर ऊस आहे. गेल्या आठवड्यात एका माथेफिरूने या ऊसाला आग लावली. या आगीत एक एकर ऊस जळाला आणि त्यांच्या सुदैवाने चार एकर ऊस वाचला. त्यातच त्यांनी समाधान मानले. आता या ऊसाचं करणार काय ? त्यामुळे त्यांनी ज्यांना जनावरे आहेत, त्या जनावरांसाठी हा ऊस फुकट घेऊन जा.. असे आवाहन केले आणि त्याला प्रतिसादही मिळाला. या माथेफिरूने केवळ यांचा ऊसच पेटवला नाहीतर त्यांचे चुलते बजरंग कोंडीबा जाधव यांच्या केळीच्या फडातील ३५० केळीची रोपे कापून नुकसान केले आहे. अशा विघ्नसंतोषी लोकांचा शोध घेऊन पोलीसांनी तत्पर कारवाई करावी; असे आवाहन रोहित जाधव (९६२३१६२८२६) यांनी केले आहे.

डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.) यांचा
अनुजा दातांचा दवाखाना



वेळ : सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत (सोमवार ते शनिवार)

उपलब्ध सुविधा...
• स्टेट ऑफ द आर्ट डेंटल चेअर
• पोर्टेबल एक्स-रे
• वेडेवाकडे/पुढे आलेल्या दातांचे ट्रीटमेंट
• लहान मुलांच्या दातांचे ट्रीटमेंट
• दातांच्या रंगाचे/पांढरे सिमेंट भरणे
• वेदनारहीत इंजेक्शन प्रणाली
• दात काढणे
• शस्त्रक्रिया करून अक्कलदाढ काढणे
• इंट्राओरल स्कॅनरद्वारे दातांचे माप घेणे
• दातांच्या आधारे पक्के दात बसवणे
• डेंटल इम्पलांटच्या सहाय्याने दात बसवणे
• पूर्ण/आंशिक कवळी कमीत कमी अपॉइंटमेंटमध्ये बसवणे
• जबड्याच्या आजारांचे निदान
• रूट कॅनल ट्रीटमेंट
• अल्ट्रासोनिक मशीनद्वारे इन्फेक्टेड टिश्यू डिब्रायडमेंट करणे
• पुढील दातांमधील गॅप बंद करणे
• अल्ट्रासोनिक मशीनद्वारे दात स्वच्छ करणे
• दात पांढरे/शुभ्र करणे
• इंट्राओरल कॅमेराद्वारे तपासणी
• तंबाखू/गुटखा सवयी सोडवण्याबद्दल कौन्सलिंग
• मुख कर्करोग निदान



कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.

Scanned with OKEN Scanner

# ग्रामपंचायत, आपण आणि विकास !



खरंतर या विषयावर लिहावं की नको.. या दोलायमान मनस्थितीत मी होतो. विषय म्हटला तर सेन्सेटिव्ह म्हटला तर कळीचा.. पण शेवटी थोडक्यात का होईना तो मांडावा म्हणून मी इथे मांडतोय.

या विषयाबाबतची सत्यता मी तपासलेली नाही, त्यामुळे त्यात खरेपणा किती आहे हे तुम्हीच ठरवायचे आहे. यातल्या साऱ्याच गोष्टी खऱ्या आहेत असे मी म्हणणार नाही. अधिकारी भ्रष्ट आहेत असेही मी म्हणणार नाही. पण त्रयस्थांकडून मला जी माहिती मिळाली त्याचे संकलन म्हणजे हा लेख होय.

आपली खेडी सुधारली पाहिजेत, खेड्यातील सर्वसामान्य माणूस सुधारला पाहिजे. त्याच्या अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, आरोग्य व शिक्षण या गरजा व्यवस्थित पूर्ण व्हायला पाहिजेत. यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील असते. कारण गाव सुधारला तर देश सुधारेल.. हे त्यामागचे सुत्र आहे. त्यासाठी ग्रामपंचायत सक्षम करण्याचे सर्वोतोपरी प्रयत्न शासन करीत असते. त्यामुळे ग्रामपंचायतीला गावाच्या सर्वांगीण विकासासाठी (?) पैसे मिळावेत म्हणून वित्त आयोगाची निर्मिती झाली. सध्याच्या ग्रामपंचायतीला जिल्हा नियोजन मंडळाकडून, आमदार - खासदार फंडातून, वित्त आयोगातून बराचसा निधी मिळतो. पण वित्त आयोग सोडला तर बाकीचे निधी मिळवण्यासाठी सरपंच व सदस्य यांची आमदार, खासदार, जि.प.सदस्य, अध्यक्ष यांच्याशी जरा बरे संबंध असावे लागतात. ज्या ग्रामपंचायती विरोधात असतात त्यांना या पुढाऱ्यांकडून निधी मिळण्याची सुताराम शक्यता नसते. त्यामुळे सत्ताधाऱ्यांकडे, त्यांच्या गटाकडे जाण्याचा सरपंच व त्यांच्या टीमचा कल असतो.

वित्त आयोगाचा निधी हा हमखास मिळणारा असतो. साधारणपणे १ हजार लोकसंख्येला १० लाख , २ हजार लोकसंख्येला २० लाख तर ५ हजार लोकसंख्येला ५० लाख रूपये एवढा निधी येतो. हा निधी कसा खर्च करायचा त्याचेही काही नियम आहेत; पण आपल्याकडे सोयीस्कर या प्रक्रियेला हरताळ फासला जातो. आता १५ वा वित्त आयोग चालू आहे. त्याच्या निधीच्या खर्चाचा आराखडा हा २६ जानेवारीला ग्रामसभेत चर्चेला यावा लागतो. पण सरपंच व ग्रामसेवक तो आराखडा ग्रामसभेमध्ये येऊच देत नाहीत. त्यावर ग्रामसभेत चर्चा झाली असे दाखवले जाते. इथूनच काळाबाजार सुरू होतो; ही फार मोठी शोकांतिका आहे.

या निधीमधील ५० टक्के निधी हा बंदिस्त असतो तर उरलेला ५० टक्के निधी हा खुला असतो. बंदिस्त निधीतील १५ टक्के शिक्षणावर १५ टक्के आरोग्यावर, १५ टक्के पाणीपुरवठ्यावर तर ५ टक्के महिला व बालकल्याणावर खर्च करावा लागतो. सरपंच व ग्रामसेवक यामध्ये कुठेतरी गटार दुरूस्ती करणे, नळाच्या फुटक्या तोट्या बदलणे, पाणी पाईप लाईन दुरूस्ती, शोषखड्डे अशी बोगस कामे दाखवून तसेच बोगस बिले आणून ते पैसे लाटतात. काही दुकानदार थोड्याफार रकमेच्या बदल्यात अशी कितीही बोगस बिले देतात. या गोष्टी काही नवीन राहिलेल्या नाहीत.

उरलेला खुला ५० टक्के निधी हा कुठेही खर्च केला जातो. त्यावर तो इथेच खर्च केला पाहिजे, असा दंडक नसतो. ५ हजार लोकवस्तीच्या गावाला जर ५० लाख रूपये निधी येत असेलतर त्यातील साधारणपणे साडेतीन लाख रूपये पाण्यावर खर्च करावा लागतो. त्याचप्रमाणे खुल्या निधी मधील काही रक्कमही पाण्यावर खर्च करता येत असते. तरीही खूप सारी गावे उन्हाळ्यात पाण्यावाचून का तळमळतात याचाही विचार आपण करायला हवा ! हा प्रश्न नुसता पाण्याचा नाहीतर गावाच्या एकूण विकासाचा आहे. या कामावर देखरेख करण्याची जबाबदारी ज्युनिअर इंजिनिअर तसेच डेप्युटी इंजिनिअर यांची असते. इस्टिमेट नूसार ते काम होते आहे का ? हे त्यांनी पाहायचे असते. त्यासाठी त्यांच्याकडे मेजरमेंट बुक असते. त्याला एम.बी. असे म्हणतात. पण ज्युनिअर इंजिनिअर १ टक्के आणि डेप्युटीला ३ टक्के रक्कम दिली की ते त्या कामाकडे फिरकत सुध्दा नाहीत. ऑफिसमध्ये बसून एम.बी. लिहिली जाते.., भरली जाते.. पैसे जर दिले नाहीतर हे इंजिनिअर प्रत्यक्ष फिल्डवर येऊन एमबी भरतात. मग ती जाणीवपूर्वक कमी लिहिली जाते. एमबी कमी म्हणजे कामाला दर्जा नाही. त्यामुळे मग मिळणारी रक्कमही कमी मिळाली जाते. आता ही ग्रामपंचायत कामे घेणारी यंत्रणा त्या सरपंचाचीच असते. नुसत्या ३ टक्के किंवा ५ टक्के कमिशनमुळे सरपंचाची आर्थिक ताकद वाढत नसते. त्यामुळे गावातील जी काही कामे टेंडरनूसार किंवा बिगर टेंडरची निघतात ती सर्व कामे त्या गावातील हेच लोक त्यांच्या हस्तका मार्फत करीत असतात. या साऱ्या गोष्टी मॅनेज करण्यासाठी शासकीय यंत्रणेसह सारेच लोक या गाव पुढाऱ्यांना मदत करतात. यांचा विरोध पत्करून बाहेरचा कोणी या कामासाठी सरसावला तर त्याला विविध कारणे दाखवून जेरीस आणले जाते. काम निकृष्ट आहे.., माझ्या हद्दीत आहे... या प्रकारची कारणे दाखवून गावातीलच कार्यकर्ते त्या ठेकेदाराला हैराण करतात. निम्मे अर्धे काम झाले की ते बंद पाडायचे. त्यामुळे त्याचे पैसे अडकतात व तो गुडघ्यावर येतो. अशारितीने जर पैसे वाटून काम मिळणार असेलतर ते किती दर्जेदार असेल याची आपण कल्पनाच केलेली बरी..!

या कामात वेळेच्या आत काही दोष निर्माण झाल्यास तो दुरूस्त करण्यासाठी संबंधित ठेकेदाराकडून १० टक्के रक्कम पंचायत समितीत अनामत म्हणून ठेवून घेतली जाते. त्याला कालदोष रक्कम म्हणतात. कामाला वर्ष पूर्ण झाले की ही १० टक्के कालदोष रक्कम बिनबोभाट त्या ठेकेदाराला म्हणजेच गावच्या पुढाऱ्याला परत केली जाते. आजपर्यंत ही काल दोष रक्कम वापरली, खर्च केली असे कुठेही दिसून आले नाही. म्हणजेच ही होणारी कामे दर्जेदारच असतात असे पंचायत समितीला वाटते.. हा मोठा विनोद आहे.

आता हे असे का तर या कामातील ३ टक्के ते ५ टक्के ग्रामनिधी.. यात घरपट्टी, वेगवेगळे कर, गावच्या हद्दीतील कारखाने, उद्योग संकुले यांच्याकडून मिळणारी कराची रक्कम हे होय ! यात कागदावर एक आकडा असतो तर प्रत्यक्षात वेगळाच आकडा त्यांच्याकडून घेतला जातो. या निधीचे ऑडीट नाही.., किती पैसे आले व किती गेले याच्या खर्चाचा तपशील नाही. हे सारे बघितल्यावर, ऐकल्यावर उमगले की सायकलवर फिरणारा एखादा सरपंच झाला की फॉर्च्युनर कशी काय घेतो..? आणि त्याला ग्रामसेवकाची चांगली साथ मिळाली तर मात्र बघायला नको..! मित्रांनो एक सांगतो.. जीवन फार सुंदर आहे फक्त ग्रामसेवक होता आले पाहिजे. आणि त्याचे व सरपंचाचे सूर जुळले पाहिजेत बस्स ! बाकीचे गावातील मोठेपणाला हापापलेल्यांना कसं काय पाटील बरं हाय का.. म्हटलं तरी पुरेसे असते. ही आपल्या गावाची शोकांतिका आहे.

गावातील विकासकामे म्हटलं की रस्ता खडीकरण करणे आणि कुठेतरी सभामंडप बांधणे हेच असते. दुसरी कामे विकासकामात येत नाही. कारण यातच खूप सारा पैसा खायला मिळतो. शासन खेड्यांच्या स्वच्छता, पाणी, आरोग्य व शिक्षणासाठी खूप सारी रक्कम ग्रामपंचायतीला देते. पण आजही आपली गावे भकास आहेत.. का ? स्वच्छतेतला स्व तर दूरदूर कुठे दिसत नाही.. का ?? दलित वस्तीचा निधी खर्च केलेला असतो पण त्या वस्तीची अवकाळा दूर झालेली नसते.. का ??? पाण्याला शासन प्रथम प्राधान्य देते, पण पाण्यावाचून तरीही खेडी का तळमळतात ? हा प्रश्न सामुदायिकरित्या या तथाकथित भुरट्यांना विचारायलाच हवा..!

राजकारण करायला पैसा लागतो, हे जरी खरे असलेतरी तो आता एक मोठा बिझनेस झाला आहे; हे वास्तव आहे. एक व्यवसाय म्हणून याकडे लोक पाहतात. नुसतं म्हणायचं जनतेच्या भल्यासाठी, पण भलं बिलं काहीच नसतं. अधिकारी आणि नेते यांच्या संगनमताने या लोकशाहीच्या कुरणावर ही मंडळी पिढ्या न पिढ्या चरणार आहेत.., आपल्यावर अधिकार गाजवणार आहेत. आपल्या जगण्याच्या दोऱ्या त्यांच्या हातात असणार आहेत आणि आपण मात्र नळ्या नुळ्या खाऊन यांच्यासाठी, मतदानासाठी उन्हात रांगेत उभे राहून यांचेच हात बळकट करणार; याला काय म्हणावे..??

**...भीष्माचार्य चांदणे, करमाळा. (९८८११७४९८८)**

**डॉ.जांभळे इमेजींग सेंटर & पॅथॉलॉजी लॅब**

बसस्टॅन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक्सच्या वर, पहिला मजला, करमाळा.

**पाहिजेत**

1) Lab Technician (DMLT)

2) RECEPTIONST

तरी इच्छुक मुले/मुली यांनी पगाराचे अपेक्षेसह त्वरीत वरील पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क करावा..!

**संपर्क : मो.नं.9021909262**

## बनसोडे यांची सहाय्यक उपनिरीक्षक पदी पदोन्नती



करमाळा (सं.प्र.) : आळसुंदे येथील नागनाथ बलभिम बनसोडे हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दला मध्ये दिल्ली येथे अनेक वर्षापासून सेवेत होते. नुकतीच त्यांची पदोन्नती झाली असून त्यांची सहाय्यक उपनिरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या या पदोन्नती बद्दल आळसुंदे ग्रामस्थांच्या वतीने विशेष अभिनंदन करण्यात आले आहे.

## सातबारा उताऱ्यावर चुक करणाऱ्या तलाठ्यास निलंबीत करा - औदुंबरराजे भोसले

करमाळा(सं.प्र.) : सातबारा उताऱ्यावर नावात, आडनावात, क्षेत्रात चुक करणाऱ्या तलाठ्यांना निलंबीत करा; अशी मागणी हिंदवी स्वराज्य ग्रुपचे संस्थापक व नेरलेचे माजी सरपंच औदुंबरराजे भोसले यांनी केली आहे. याबाबत भोसले यांनी जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की तलाठ्यांनी सातबारा उताऱ्यावर चुका केल्यातर त्या चुका दुरूस्त करण्यासाठी वर्षे, दोन वर्षे, तीन वर्षे असा कालावधी जातो. वेळ व पैसा जातो, माणसे त्रस्त होतात. त्यामुळे चुक करणाऱ्या तलाठ्यांना निलंबित करा; अशी मागणी औदुंबरराजे भोसले यांनी केली आहे.







Scanned with OKEN Scanner